# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

निष्काम जन सेवार्थ समर्पिता

फोन नं. (0240)2333536-40. 2348001-05 (PBX)
फॅक्स नं. (0240)2331213

प्रधान मंत्री आवास योजना-शहरी


जा.क्र./मनपा/PMAY/2022/216 दिनांक: 20/12/2022

## जाहीर प्रगटन

औरंगाबाद शहरातील सर्व नागरिकांना याद्वारे जाहीर आवाहन करण्यात येते की, “सर्वासाठी घरे” या संकल्पनेवर आधारित प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) घटक क्र.3 - खाजगी भागीदारीद्वारे परवडणा-या घरांची निर्मिती करणे (AHP) या घटकांतर्गत भारतात कोठेही पक्के घर/सदनिका नसलेल्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील व्यक्तींकरीता केंद्र शासनाकडून रक्कम रु.1.50 लक्ष आणि राज्य शासनाकडून रक्कम रु.1 लक्ष घरकुलासाठी अनुदान उपलब्ध करून देण्यात येते. या घटकांतर्गत योजनेचा लाभ देणेसाठी पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करणे आहे. त्यासाठी पूर्वी अर्ज दाखल केलेले आणि नवीन अर्जदारांकडून ऑनलाईन पध्दतीने तसेच ऑफलाईन पध्दतीने अर्ज दाखल करणेसाठी खालील 9 प्रशासकीय झोन कार्यालयात अर्ज भरून स्विकारणेची व्यवस्था करण्यात आलेली आहे. अर्ज दाखल करणेचा कालावधी दिनांक 19/12/2022 ते 20/01/2023 पर्यंत आहे.

| झोन/वार्ड कार्यालय | पत्ता |
|---|---|
| 1-A | टाऊन हॉल, महानगरपालिका मुख्यालय. |
| 2-G | निर्माण भारती कॉम्प्लेक्स, सिल्लेखाना रोड. |
| 3-C | सेंट्रल नाका, बायजीपुरा. |
| 4-H | एन-11 हडको, सौभाग्य मंगल् कार्यालय समोर. |
| 5-B | सिडको कार्यालयाच्या बाजुला, टाऊन सेंटर. |
| 6-E | सिडको कार्यालयाच्या बाजुला, टाऊन सेंटर. |
| 7-F | मालखरे बिल्डींगजवळ, गारखेडा. |
| 8-I | रेल्वेस्टेशन, ग्रेट पंजाब हॉटेल जवळ. |
| 9-D | मुळे तापडीया कॉम्प्लेक्स बिल्डींग, मोंढा नाका, जालना रोड. |

ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्यासाठी अर्जदाराने औरंगाबाद महानगरपालिकेच्या www.aurangabadmahapalika.org या संकेतस्थळावर जाऊन PMAY च्या टॅब बटनवर क्लिक करून अर्ज भरावा. अर्ज भरणे करीता खालील नमूद कागदपत्रे आवश्यक आहे.

1. स्वयंघोषित प्रतिज्ञापत्र (अर्जा सोबतचे)
2. उत्पन्नाचे प्रमाणपत्र (वर्ष 2021-2022) रक्कम रूपये 3.00 लक्ष पर्यंत.
3. रहिवाशी प्रमाणपत्र

4. कुटुंब प्रमुख व कुटुंबातील इतर व्यक्तींचे आधार कार्ड
5. बँकेचे पासबुक
6. दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र (असल्यास)
7. जातीचा दाखल (असल्यास)
8. पूर्वी अर्ज दाखल केला असल्यास त्याचा क्रमांक अथवा अर्जाची प्रत.

**डॉ.अभिजित चौधरी** (भाप्रसे)
आयुक्त तथा प्रशासक,
महानगरपालिका, औरंगाबाद.